## निधन

संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी, व्यक्तींनी व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण केले. महापालिकेसमोर अंत्ययात्रा आली असता, महापालिकेच्या वतीने उपमहापौर आनदराव सुतार यानी

(पान १० वर)

# शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांचे निधन

(पान १ वरून)

पुष्पहार घातला. अंत्ययात्रेत महापौर सौ. जयश्री जाधव, उपमहापौर आनंदराव सुतार, माजी आमदार एन. डी. पाटील, दैनिक 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. रा. कृ. कणबरकर, दिग्दर्शक दिनकर द. पाटील, कर्नल शंकरराव निकम, मराठा बँकेचे अध्यक्ष ॲड. मदनराव भोसले, स्थायी समिती सभापती सुरेश गवळी, नगरसेवक भिकशेठ पाटील, शेतकरी संघटनेचे खंडेराव घाटगे, अनिलपंत कौरगांवकर, बाबा देसाई, प्राचार्य सी. आर. गोडसे, नगरसेवक गजानन भालकर, प्रा. आबासाहेब शिंदे, प्राचार्य के. आर. यादव, काका देसाई, जयसिंगराव पाटील आदि मान्यवर सहभागी झाले होते.

पंचगंगा स्मशानभूमित दुपाली दोन वाजतां व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांचे मानसपुत्र व पुतणे प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यानी चितेस अग्नी दिला.

**समाज सेवेसाठी जीवन समर्पीत**

पंचगंगा स्मशानभूमीत झालेल्या शोकसभेत अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणात भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्राचार्य रा. कृ. कणबरकर शोकसभेत बोलताना म्हणाले की, व्ही. टी. पाटील कार्याच्या रूपाने अमर आहेत. समाजाच्या सेवेसाठी वचनबद्ध होऊन त्यांनी आपले जीवन समर्पित केले. सहकार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात त्यांनी उत्तुंग कार्य केले. निस्वार्थी ध्येयवादी व्यक्तीमत्त्वाचा ठसा त्यांनी समाजावर उमटविला. महिलांना सक्षम बनविण्यासाठी त्यांचा शैक्षणिक विकास घडविण्यासाठी त्यांनी काम केले. ताराराणी महिला विद्यापीठ कोल्हापुरात स्थापन झाले तरच त्यांच्या आत्म्यास शांती मिळणार आहे.

**महापालिकेत श्रद्धांजली**

भूतपूर्व कोल्हापूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या दुःखद निधनाबद्दल कोल्हापूर महानगरपालिकेत झालेल्या शोकसभेत स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शोक सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर सौ. जयश्री जाधव होत्या. काकाजींच्या निधनाबद्दल महापालिकेचे कामकाज बंद ठेवण्यात आले. सभेस आयुक्त बिपीन मलिक, उपायुक्त दिलीप करंदीकर, नगरसचिव व्ही. के. सावंत आदी उपस्थित होते.

येथील गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमार्फत श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राचार्य सी. आर. गोडसे शोकसभेच्या अध्यक्षस्थानी होते. व्ही. टी. पाटील स्त्री शिक्षणाचे प्रणेते होते. कोल्हापूर स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ व्हावे हे त्यांचे स्वप्न पूर्ण करणे ही त्यांना श्रद्धांजली ठरेल, अशा शब्दात दस्तगीर समशेर उस्ताद यानी श्रद्धांजली वाहिली.

बिद्री येथील श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष व्ही. टी. पाटील याना कारखाना कार्यस्थळावर संचालक मंडळ, सभासद व शेवकांतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. कारखान्याचे कामकाज आज बंद ठेवण्यात आले.

दरम्यान आमचा गारगोटीचा वार्ताहर कळवितो की काकांच्या निधनाचे वृत्त समजताच कडगाव व गारगोटीतील सर्व शैक्षणिक संस्था व काही व्यवहार बंद करण्यात आले.

दै. तरुण भारत, कोल्हापूर-सांगली, बुधवार दि. १८ जानेवारी १९९५

तरुण भारत

दै. तरुण भारत, कोल्हापूर बुधवार १८ जानेवारी १९९५ पान ३

